


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३०३ • मंगळवार दि.१ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## खुल्या तेल विक्रीला वर्षभराची मुदतवाढ

### व्यापारी व ग्राहकांच्या मागणीनंतर सरकारचा निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-खाद्य तेलातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुट्ट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर निर्बंध आणले होते. मात्र, या निर्णयामुळे छोटे व्यापारी आणि सर्वसामान्य ग्राहकांवर आर्थिक परिणाम होत असल्याच्या तक्रारीनंतर राज्य सरकारने सुट्टे खाद्यतेल विक्री करणाऱ्यांना एक वर्षाची मुदत दिली आहे.

सुट्टे तेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या. त्यानंतर सरकारने हा निर्णय घेतला. मात्र, एक वर्षानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. या कालावधीत व्यापाऱ्यांनी व्यवसाय पद्धतीत आवश्यक बदल करून कायद्याचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.सुट्ट्या तेलाबाबतचा कायदा २०११ मध्ये करण्यात आला असून, खाद्यतेलाची गुणवत्ता हा महत्त्वाचा निकष असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मात्र, गरीब आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणावर सुट्टे तेल खरेदी करतात. त्यामुळे कायद्याचे पालन करताना सामान्य नागरिकांच्या गरजांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, पारंपरिक पद्धतीने तेल विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना कायद्यानुसार कोणते बदल करावे लागतील, याचा अभ्यास करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार राज्य सरकारकडून मदतही केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाची सूत्रे स्वीकारल्यानंतर खाद्यपदार्थातील भेसळ आणि निकृष्ट दर्जाविरोधात कारवाईला वेग आला आहे. त्यामुळे सुट्ट्या तेलाच्या विक्रीवरही नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली होती. सरकारच्या नव्या निर्णयामुळे व्यापाऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी एक वर्षानंतर नियमांची अंमलबजावणी कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## डिजीटल अरेस्टची भीती दाखवून ३१ लाख रुपये उकळले

नांदेड/प्रतिनिधी-डिजीटल अरेस्टची भीती दाखवून एका जणांस ३१ लाख रुपये उकळून फसवणूक केल्या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




नांदेड शहरातील श्रीनगर परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीशी २१ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अमनकुमार शर्मा व संदीपराव यांनी संपर्क साधला. आरोपींनी व्हॉट्सप कॉलच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीशी संपर्क साधत स्वतःची ओळख केंद्र शासनाचे अधिकारी तसेच पोलिस अधिकारी म्हणून करून दिली. यावेळी पोलिसांच्या गणवेशातील व्यक्तीही व्हिडिओ कॉलवर दाखविण्यात आल्याने समोरील व्यक्तीचा आरोपींवर विश्वास बसला.त्यानंतर आरोपींनी संबंधित व्यक्तीला विविध प्रकरणांमध्ये त्याचे नाव समोर आले असल्याचे सांगितले. तसेच त्याच्यावर कारवाई होऊ शकते, अटक केली जाऊ शकते आणि त्याला डिजिटल अरेस्ट करण्यात येईल, अशी भीती निर्माण केली. पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांच्या नावाचा धाक दाखवत आरोपींनी संबंधित व्यक्तीला मानसिक दबावाखाली ठेवले. वेगवेगळ्या कारणांचा आधार घेत आरोपीनी संबंधित व्यक्तीकडून तब्बल ३१ लाख २० हजार रुपये ऑनलाइन पान ४ वर

## नशामुक्त महाराष्ट्राचा संकल्प

### मंत्रिमंडळ बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने व्यापक पाऊल उचलले आहे. नशामुक्त भारत अभियानांतर्गत राज्य शासनाचे सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन धोरण राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. २०२९ पर्यंत महाराष्ट्र नशामुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गृह, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अंमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी केवळ एका विभागापुरते मर्यादित न राहता शासनाच्या विविध विभागांनी समन्वयाने काम करण्यावर या धोरणात भर देण्यात आला आहे. अंमली पदार्थांची निर्मिती, वाहतूक, विक्री आणि सेवन रोखण्यासोबतच व्यसनमुक्ती, जनजागृती आणि पुनर्वसनाच्या उपाययोजनांनाही प्राधान्य दिले जाणार आहे. शासकीय व निमशासकीय बैठका, विविध कार्यक्रम तसेच शासकीय उपहारगृहांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या धोरणालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यापुढे अशा ठिकाणी संतुलित मेन्यू ठेवणे पान ४ वर

## 'बदलाव जरुरी है'हा जनतेचा आवाज-कॉ.डी.राजा

नवी दिल्ली:देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकरी व कामगारांचे प्रश्न आणि वाढती आर्थिक विषमता यामुळे सर्वसामान्य जनतेत असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बदलाव जरूरी है हा केवळ भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा नारा नसून जनतेच्या मनातील आवाज आहे, असा दावा सीपीआयखचे सरचिटणीस डी. राजा यांनी केला. दिल्लीतील रामलीला मैदानावर मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या भव्य रॅलीत ते बोलत होते.

### भाकपच्या घोषणांनी दिल्लीतील रामलीला मैदान दुमदुमले

देशाच्या विविध भागांतून आलेले कामगार, शेतकरी, विद्यार्थी, युवक, महिला आणि नागरिक या रॅलीत सहभागी झाले. महागाई, बेरोजगारी, घटती क्रयशक्ती, शेतकरी आणि कामगारांचे प्रश्न तसेच संविधान व लोकशाहीच्या संरक्षणाचा मुद्दा यावेळी प्रमुखपणे मांडण्यात आला.डी. राजा यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करताना देशातील आर्थिक आणि सामाजिक संकट अधिक गंभीर होत असल्याचा आरोप केला. महागाई नियंत्रणात आणणे, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, सार्वजनिक शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था मजबूत करणे, शेतमालाला किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी देणे तसेच कामगारांचे हक्क आणि सामाजिक सुरक्षा बळकट करणे, या मागण्या रॅलीतून करण्यात आल्या.सीपीआय नेत्या ॲनी राजा यांनीही देशातील वाढत्या आर्थिक विषमतेचा मुद्दा उपस्थित केला. विकासाच्या आकडेवारीसोबतच उत्पन्न आणि संपत्तीचे वाटप सर्वसामान्यांच्या हिताचे आहे का, याचा विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारच्या धोरणांचा मोठ्या उद्योगांना अधिक फायदा होत



असल्याचा आरोप करत सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या धोरणांची गरज त्यांनी व्यक्त केली. रॅली दरम्यान केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## खा.राहुल गांधी यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याच्या निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन




नांदेड/प्रतिनिधी-लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खा.राहुल गांधी यांच्या विरुद्ध उत्तराखंडमधील भाजप सरकारने सुडबुद्धीने गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्यावतीने आज आयटीआय चौकात आंदोलन करण्यात आले आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी उत्तराखंडमध्ये जाहीर सभा घेतली होती. सभा संपल्यानंतर काही हिंदूत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जागेचे शुद्धीकरण केले आहे. या घटनेमुळे देशभरात तीव्र संताप निर्माण झाला. सदरील घटनेबाबत लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांनी जोरदार टीका उत्तराखंड सरकारवर व शुद्धीकरण करणाऱ्या संबंधीत संघटनेच्या कार्यकर्त्यांवर केली होती. उत्तराखंडमधील भाजप सरकारने खा.राहुल गांधी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदरील गुन्हा दाखल केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्यावतीने मंगळवारी आयटीआय चौकातील महात्मा फुले यांच्या पान ४ वर




जळगाव जिल्ह्यातील मौजे शिवरे येथे कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी पी.एन.पाटील यांचा ग्रामसभेतील गोंधळामुळे मृत्यू झाला असून या घटनेची तात्काळ चौकशी करावी व अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा आज (मंगळवार) काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने ग्रामपंचायत अधिकारी सहभागी झाले होते.

## तमिळनाडूतील रुग्णाला नांदेडच्या नारायणा हॉस्पिटलमध्ये जीवदान

नांदेड/प्रतिनिधी-व्यवसायाच्या कामानिमित्त तमिळनाडूतील सालेम येथून नांदेडमध्ये आलेल्या एका व्यक्तीला अचानक तीव्र छातीत दुखू लागल्याने तातडीने नारायणा हॉस्पिटल, नांदेड येथे दाखल करण्यात आले. रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने तत्परतेने उपचार सुरू करत आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. पुढील तपासणीत हृदयाच्या दोन रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर हृदयरोग तज्ज्ञांनी यशस्वी अँजिओप्लास्टी करून स्टेंट बसविला.

अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे रुग्णाच्या कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. सुरुवातीला पुढील उपचार आणि अँजिओग्राफीसाठी रुग्णाला पुन्हा घरी घेऊन जाण्याचा विचार कुटुंबीयांनी केला होता.मात्र,याबाबत त्यांनी जवळपास २० मित्र, व्यावसायिक सहकारी आणि व्यावसायिक ग्राहकांकडून सल्ला घेतला. या सर्वांनी नारायणा हॉस्पिटलवरील विश्वास व्यक्त करत उपचार नांदेडमध्येच सुरू ठेवण्याचा सल्ला दिला. दरम्यान, रुग्णालयातील




डॉक्टरांनी कुटुंबीयांना परिस्थितीची सविस्तर माहिती देत पुढील उपचार त्यांच्या घराजवळील रुग्णालयातही करता येऊ शकतात, असे स्पष्ट केले. मात्र, डॉक्टरांच्या तज्ज्ञतेवर आणि रुग्णालयातील उपचारपद्धतीवर विश्वास असल्याने कुटुंबीयांनी नांदेडमध्येच उपचार सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर करण्यात आलेल्या अँजिओग्राफीमध्ये हृदयाच्या दोन रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज असल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कार्डियाक टीमने तातडीने अँजिओप्लास्टी करण्याचा निर्णय घेतला. यशस्वीरीत्या अँजिओप्लास्टी करून आवश्यक ठिकाणी स्टेंट बसविण्यात आला. उपचारानंतर रुग्णाच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली असून सध्या तो छातीत कोणतीही वेदना नसताना प्रकृतीत सुधारणा करत आहे. अचानक आलेल्या वैद्यकीय संकटाच्या वेळी तातडीने मिळालेली वैद्यकीय मदत, डॉक्टरांची तज्ज्ञता, रुग्ण आणि कुटुंबीयांना दिलेली मानसिक आधाराची साथ तसेच संपूर्ण वैद्यकीय पथकाने दाखविलेली संवेदनशीलता याबद्दल कुटुंबीयांनी नारायणा हॉस्पिटल, नांदेडच्या टीमचे मनःपूर्वक आभार मानले. तमिळनाडूतील सालेम येथून व्यवसायासाठी आलेल्या रुग्णाला नांदेडमध्येच वेळेवर आणि यशस्वी हृदयविकार उपचार मिळाल्याने कुटुंबीयांचा रुग्णालयावरील विश्वास अधिक दृढ झाला. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार मिळणे किती महत्त्वाचे असते, याचे हे उदाहरण ठरले आहे.

## नवरात्रीपूर्वी ठाकरेंचे १४ आमदार फोडणार; शिंदेसेनेचा दावा

मुंबई/प्रतिनिधी-नवरात्रोत्सवापूर्वीच उद्धव ठाकरे यांचे १४ आमदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत येतील असा दावा शिंदे सेनेकडून केला जात आहे. पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरच्या चर्चांनी राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला आज सुरुवात झाली असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अनुपस्थितीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२ वाजता मंत्रिमंडळाची बैठक सुरू झाली. मात्र, शिंदे बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित नसल्याने त्यांच्या गैरहजेरीमागील कारणाबाबत तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. एकनाथ शिंदे काल भीमाशंकर दौऱ्यावर होते. त्यामुळे मुंबईत परतण्यास उशीर झाल्याने ते बैठकीला अनुपस्थित राहिले की, या गैरहजेरीमागे अन्य काही राजकीय कारण आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्तींयांकडून नवरात्रोत्सवापूर्वी मोठे ऑपरेशन टायगर होणार असल्याचा दावा केला जात आहे. एकनाथ शिंदे आज संध्याकाळी दिल्लीला रवाना पान ४ वर

# आरक्षणाचा तिढा आणि संघर्षाची वाढती धार

**मराठा आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा धगधगता केंद्रबिंदू बनला आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे २९ ऑगस्टपासून सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज चौथा दिवस आहे. हे त्यांचे अकरावे उपोषण आहे. उपोषणाच्या पार्श्वभूमीवर त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली असून रक्तदाब आणि रक्तातील साखरेत घट झाल्याचे वृत्त आहे. वैद्यकीय पथकाने तपासणी करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांनी वैद्यकीय तपासणीस नकार दिला. दरम्यान, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी मध्यरात्री उपोषणस्थळी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू केवळ मराठा आरक्षणापुरता मर्यादित राहिलेला नाही. पात्र मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे देणे, सगे-सोयऱ्यांच्या अधिसूचनेची अंमलबजावणी, जात पडताळणी समित्यांबाबतची भूमिका आणि आंदोलनातील विविध मागण्या यामुळे हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. सरकारने शोधलेल्या कुणबी नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्याची मागणी जरांगे यांनी केली आहे. जात पडताळणी समित्या बरखास्त करण्याची मागणीही त्यांनी पुढे केली आहे. या मागणीला ओबीसी नेते आणि कायदेतज्ज्ञांकडून विरोध होत असल्याचेही समोर आले आहे. मात्र आता या आंदोलनाचा पुढचा टप्पा अधिक गंभीर ठरण्याची शक्यता आहे. मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा जरांगे यांनी दिला असून १२ सप्टेंबरपर्यंत मराठा समाजाने मुंबईत पोहोचावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. मुंबईत आंदोलनासाठी मोठ्या संख्येने लोक पोहोचावेत, अशी त्यांची भूमिका आहे. आंदोलनाची दिशा आणि स्वरूप याबाबत त्यांनी समर्थकांना विविध सूचना केल्या आहेत.या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदेशीर आणि घटनात्मक चौकटीत बसणाऱ्या मागण्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शविली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही, याचीही सरकारला काळजी घ्यावी लागणार आहे.परंतु एका बाजूला संवादाची भाषा आणि दुसऱ्या बाजूला राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू राहिले तर प्रश्न सुटण्याऐवजी अधिक चिघळण्याची शक्यता आहे.जरांगे-पाटील सरकारवर कडाडून टीका करीत आहेत. सत्ताधारी नेत्यांकडूनही त्यांना प्रत्युत्तर दिले जात आहे. लोकशाहीत सरकारवर टीका करण्याचा आणि आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. त्याचप्रमाणे सरकारलाही आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. परंतु हा अधिकार परस्परांवर राजकीय चिखलफेक करण्यासाठी वापरला जाऊ लागला, तर त्यातून तोडगा निघत नाही. उलट समाजातील अस्वस्थता वाढते. सध्या महाराष्ट्राला नेमकी हीच भीती आहे.मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीमागे रोजगार, शिक्षण, आर्थिक अडचणी आणि स्पर्धेतील वाढती असुरक्षितता यांसारखे अनेक सामाजिक प्रश्न आहेत. त्यामुळे या आंदोलनाकडे केवळ राजकीय दबावाचे साधन म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. त्याचवेळी ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या हक्कांबाबत निर्माण होणारी भीती आणि असुरक्षितताही दुर्लक्षित करता येणार नाही. एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाच्या हक्कांवर गदा येणार नाही, याची खात्री सरकारला द्यावी लागेल. आरक्षणाचा प्रश्न हा भावनेइतकाच संविधान, कायदा आणि उपलब्ध आकडेवारीशी जोडलेला आहे.म्हणूनच आता सरकारने आणि जरांगे-पाटील यांनी प्रतिष्ठेचा प्रश्न बाजूला ठेवून संवादाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे. उपोषणकर्त्याची प्रकृती बिघडत असताना सरकारचे प्रतिनिधींनी केवळ राजकीय प्रतिक्रिया देत राहणे योग्य नाही. त्याचवेळी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांनीही समर्थकांना संयम राखण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. मुंबईकडे लाखोंचा लोंढा वळल्यास वाहतूक, कायदा-सुव्यवस्था आणि सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन यावर परिणाम होणार हे उघड आहे. महाराष्ट्राने आरक्षणाच्या प्रश्नावर यापूर्वी अनेक आंदोलने, संघर्ष आणि तणाव अनुभवले आहेत. पुन्हा त्याच मार्गावर जाणे कोणाच्याही हिताचे नाही. ''सरकारकडे निर्णय घेण्याची क्षमता आहे, तर आंदोलकांकडे जनमताचा दबाव आहे.'' या दोन्ही शक्तींचा संघर्ष करण्याऐवजी संवादासाठी उपयोग झाला पाहिजे. मराठा आरक्षणाचा प्रश्न रस्त्यावरच्या संघर्षाने नव्हे, तर संविधानिक चौकटीत, न्याय्य आणि टिकाऊ तोडग्यानेच सुटणार आहे. त्यामुळे चौथ्या दिवसात पोहोचलेल्या या उपोषणाला आणखी दिवसांची लांबी देण्यापेक्षा संवादाची उंची वाढविणे हीच सरकार आणि आंदोलनाच्या नेतृत्वाची खरी कसोटी आहे.**

# मराठीची सक्ती योग्य आहे का?

महाराष्ट्रात मराठी ही मायबोली आहे. मराठी भाषेचा अभिमान प्रत्येक मराठी माणसाला असलाच पाहिजे. आपल्या मातृभाषेचा सन्मान करणे, तिचे संवर्धन करणे आणि पुढच्या पिढीपर्यंत तिची समृद्ध परंपरा पोहोचवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मात्र, मराठीचा अभिमान बाळगणे आणि मराठीच्या नावाखाली दुसऱ्या भाषेचा अथवा दुसरी भाषा बोलणाऱ्या माणसाचा तिरस्कार करणे, यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. भाषेचा सन्मान व्हावा, यासाठी प्रेमाची आणि आग्रहाची भाषा चालू शकते; परंतु दबावाची, दहशतीची किंवा सक्तीची भाषा स्वीकारणे कितपत योग्य आहे, हा गंभीर प्रश्न आहे.

आज महाराष्ट्रात मराठीच्या सक्तीवरून वातावरण तापत आहे. मराठी शिकावी, मराठी बोलावी, महाराष्ट्रात राहताना मराठीचा सन्मान करावा, याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. परंतु एखाद्या व्यक्तीला तिच्या सोयीची भाषा बोलण्यापासून रोखणे, तिच्यावर दबाव आणणे किंवा केवळ ती मराठी बोलत नाही म्हणून तिच्याकडे संशयाने पाहणे, ही भूमिका महाराष्ट्राच्या व्यापक आणि समावेशक संस्कृतीला शोभणारी नाही. महाराष्ट्राने नेहमीच बाहेरून आलेल्या माणसाला सामावून घेतले आहे. त्यामुळे आज आपण कोणाला परका ठरविताना आपल्या इतिहासाकडे आणि संस्कृतीकडे एकदा तरी मागे वळून पाहिले पाहिजे.माणूस हा भाषेपेक्षा मोठा आहे. माणूस जगण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातो. रोजगारासाठी, व्यवसायासाठी, शिक्षणासाठी, सुरक्षिततेसाठी किंवा चांगल्या भविष्याच्या शोधात लोक स्थलांतर करतात. आज मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेली माणसे राहतात. त्यांच्या वेगवेगळ्या भाषा आहेत, वेगवेगळ्या संस्कृती आहेत, वेगवेगळ्या परंपरा आहेत. तरीही ते महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा भाग बनले आहेत. मुंबई तर जगातील महत्त्वाच्या महानगरांपैकी एक आहे. देशातील विविध राज्यांतून आलेल्या लाखो लोकांना या शहराने रोजगार, व्यवसाय आणि जगण्याची संधी दिली आहे.मग अशा परिस्थितीत भाषेच्या प्रश्नावर दबावतंत्राचा वापर करणे कितपत योग्य आहे? भाषा ही माणसाच्या भावविश्वाशी जोडलेली गोष्ट आहे. ज्या भाषेत माणूस सहज व्यक्त होतो, ज्या भाषेत त्याला भावना मांडणे सोपे जाते, तीच भाषा त्याला जवळची वाटते. एखादा हिंदी भाषिक महाराष्ट्रात आला म्हणून तो पहिल्याच दिवशी अस्खलित मराठी बोलेल, अशी अपेक्षा करणे व्यवहार्य नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील एखादा माणूस रोजगारासाठी उत्तर भारतात गेला, तर त्याला तेथील भाषा आत्मसात करण्यासाठी काही काळ लागणारच. भाषेचे शिक्षण हे प्रेमाने, संवादाने आणि गरजेने होते; दडपशाहीने नव्हे.मराठी शिकण्याची गरज नाही, असेही म्हणता येणार नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने स्थानिक भाषेचा किमान व्यवहार समजून घेतला पाहिजे. स्थानिक समाजाशी संवाद साधण्यासाठी मराठी येणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. परंतु मराठी शिका हा आग्रह आणि मराठीच बोला, नाहीतर परिणाम भोगा हा दबाव यामध्ये फरक आहे. पहिली भूमिका समाज जोडते; दुसरी भूमिका समाजात दरी निर्माण करते.महाराष्ट्राच्या प्रत्येक भागाची भाषा एकसारखी नाही. विदर्भात गेल्यावर मराठीची बोली बदलते. मराठवाड्यात वेगळे शब्दप्रयोग आढळतात. कोकणात भाषेची लय वेगळी आहे. पश्चिम महाराष्ट्रात बोलण्याची ढब वेगळी आहे. अगदी काही किलोमीटरच्या अंतरावरही उच्चार, शब्द आणि बोलीतील फरक जाणवतो. अनेक ठिकाणी तर पन्नास किलोमीटरच्या परिसरात भाषेचा बाज बदललेला दिसतो. मग भाषेचे एकच प्रमाण लावून प्रत्येक माणसाला मोजणे कितपत योग्य?

भाषेतील ही विविधता हीच महाराष्ट्राची ताकद आहे. मराठी भाषा एका साच्यात अडकलेली नाही. तिने अनेक बोली, अनेक शब्द आणि अनेक संस्कृती आत्मसात केल्या आहेत. त्यामुळे मराठीला समृद्ध करण्यासाठी इतर भाषांशी संवाद आवश्यक आहे. एखाद्या भाषेला बंदिस्त करून तिचे संरक्षण होत नाही. उलट संवादातून भाषा अधिक समृद्ध होते. आज महाराष्ट्रातील अनेक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी धडपड करतात. त्यामागे त्यांचा हेतू चुकीचा नाही. इंग्रजी आल्यास जगाशी संवाद साधता येतो, रोजगाराच्या संधी वाढतात, विज्ञान-तंत्रज्ञानाची माहिती मिळते, जगातील घडामोडी समजतात. इंग्रजीमुळे जगाचे दरवाजे उघडले, हे आपण नाकारू शकत नाही. मग आपल्या मुलांना इंग्रजी शिकवताना आपण इतर भाषांबाबत इतके असहिष्णू का व्हावे? भाषा ही ज्ञानाची साधने आहेत. मराठी आपली ओळख आहे, हिंदी संवादाचे माध्यम असू शकते, इंग्रजी जागतिक ज्ञानाचे माध्यम ठरू शकते आणि इतर भाषा रोजगार किंवा व्यवहारासाठी उपयुक्त ठरू शकतात. एका भाषेला स्वीकारण्यासाठी दुसऱ्या भाषेचा द्वेष करण्याची गरज नाही.मराठीचा अभिमान असावा; पण दुसऱ्या भाषेचा तिरस्कार नसावा. हीच खरी माणुसकी आहे. भाषेच्या प्रश्नावरून वातावरण तापवणे फार सोपे आहे. एखादे वादग्रस्त विधान करायचे, समाजमाध्यमांवर त्याची चर्चा सुरू करायची, काही लोकांनी प्रतिक्रिया द्यायच्या आणि त्यातून दोन समाजघटकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण करायचे, हा आजच्या राजकारणाचा धोकादायक प्रवाह बनत चालला आहे. प्रसिद्धीसाठी वाद निर्माण करणाऱ्या प्रत्येक वक्तव्यामागे समाजहित असेलच असे नाही. त्यामुळे कोण बोलले, का बोलले आणि त्याचा परिणाम काय होणार आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आज महाराष्ट्र आधीच अनेक समस्यांनी त्रस्त आहे. शेतकरी अडचणीत आहे. बेरोजगारीचा प्रश्न आहे. महागाईचा प्रश्न आहे. शिक्षणाचा खर्च वाढत आहे. आरोग्यव्यवस्था अनेक ठिकाणी अपुरी आहे. तरुणांच्या हाताला रोजगार हवा आहे. उद्योगांना स्थैर्य हवे आहे. शहरांना पायाभूत सुविधा हव्या आहेत. गावांना पाणी, रस्ते आणि आरोग्य सुविधा हव्या आहेत. या प्रश्नांवर व्यापक चर्चा व्हायला हवी. त्याऐवजी रोज नवा वाद उभा करून समाजाचे लक्ष मूळ प्रश्नांपासून हटविण्यात काय अर्थ आहे?सत्ताधाऱ्यांनाही सुख नाही आणि सामान्य जनतेलाही नाही. रोज एखादे नवे प्रकरण समोर येते. जुनी प्रकरणे तपासाच्या नावाखाली रेंगाळत राहतात. एखाद्या प्रकरणावर काही दिवस वातावरण तापते आणि नंतर ते शांत होते. अंबाजोगाईचे प्रकरण असो किंवा नाशिकमधील अशोक खरात यांच्याशी संबंधित प्रकरण असो, जनतेसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. चौकशी सुरू असल्याचे सांगितले जाते; पण त्या चौकशीचा अंतिम निष्कर्ष काय, दोषी कोण, जबाबदारी कोणाची, हे प्रश्न अनुत्तरित राहतात. अशा वेळी समाजाचे लक्ष भाषिक किंवा इतर भावनिक मुद्द्यांकडे वळवणे हा योग्य मार्ग नाही.

सुखाने जगा आणि लोकांनाही जगू द्या ही केवळ म्हण नाही, तर सामाजिक जीवनाचा मूलभूत मंत्र आहे. प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. आपल्या भाषेचा सन्मान करताना दुसऱ्याच्या भाषेचा अपमान होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. कारण माणसे जोडणे ही समाजाची पहिली



जबाबदारी आहे; माणसे तोडणे नव्हे.आपण यापूर्वीही भाषा, धर्म आणि संस्कृतीच्या नावावर अनेक संघर्ष पाहिले आहेत. भोंग्यांच्या प्रश्नावरून वातावरण तापले. काही काळ राजकीय संघर्ष झाला. त्यानंतर तो विषय बाजूला पडला. अशा अनेक प्रश्नांचा अनुभव महाराष्ट्राला आहे. प्रश्न उपस्थित करणे चुकीचे नाही; परंतु प्रश्न सोडवण्याऐवजी त्याचा राजकीय उपयोग करून समाजात संघर्ष निर्माण करणे धोकादायक आहे.जात, धर्म, भाषा, वर्ण, श्रीमंती-गरिबी अशा अनेक स्तरांवर समाज आधीच विभागलेला आहे. त्यात आणखी एक भिंत उभी करणे म्हणजे सामाजिक तणावाला आमंत्रण देणे होय. सामान्य माणूस आधीच आर्थिक आणि मानसिक तणावाखाली जगत आहे. त्याच्या मनात सतत संशय आणि भीती निर्माण झाली तर समाजाच्या आरोग्यासाठी ते चांगले ठरणार नाही.विशेषतः तरुण पिढीच्या मनावर अशा संघर्षांचा परिणाम होतो. सोशल मीडियाच्या माध्यमातून काही सेकंदांत एखादे विधान लाखो लोकांपर्यंत पोहोचते. त्याचा संदर्भ वेगळा असू शकतो, पण त्यातून निर्माण झालेला गैरसमज मोठा असतो. भावनेच्या भरात प्रतिक्रिया देणाऱ्या तरुणांनी विचार करणे आवश्यक आहे. समाजात आधीच असलेले तणाव पेटवण्यासाठी कोणाच्या हातातील साधन बनायचे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. तेल ओतू नका, भडका उठेल आणि तो विझवणे अवघड होईल, ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आग लावणे सोपे असते; पण ती विझवण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागते. सामाजिक संघर्षाचीही हीच गोष्ट आहे. एका चुकीच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेला संघर्ष पुढे कुठे जाईल, याचा अंदाज कोणालाच येत नाही. म्हणूनच सार्वजनिक जीवनात असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या शब्दांची जबाबदारी घेतली पाहिजे. मराठी ही केवळ भाषा नाही; ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि अस्मितेची वाहक आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, समर्थ रामदास, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांमध्ये समाजाला जोडण्याची ताकद आहे. महाराष्ट्राची परंपरा माणसाला माणसाशी जोडणारी आहे. त्यामुळे मराठीच्या नावाखाली माणसांमध्ये दुरावा निर्माण झाला तर ती मराठीची सेवा ठरणार नाही. मराठीचा प्रसार करायचा असेल तर मराठी अधिक सक्षम करा. मराठीमध्ये उत्तम शिक्षण द्या. मराठीत विज्ञानाचे साहित्य निर्माण करा. तंत्रज्ञानाची पुस्तके मराठीत आणा. उत्तम प्रशासन मराठीत करा. न्यायव्यवस्थेतील माहिती सर्वसामान्यांना मराठीत उपलब्ध करून द्या. मराठीतील रोजगाराच्या संधी वाढवा. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये द्या. मराठी चित्रपट, साहित्य, नाटक, पत्रकारिता, संशोधन आणि डिजिटल माध्यमे अधिक सक्षम करा. या मार्गाने मराठीचा प्रभाव वाढेल. दबाव टाकून मिळवलेली भाषा मनात जागा निर्माण करू शकत नाही. प्रेमाने शिकलेली भाषा मात्र आयुष्यभराची सोबती बनते.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

महाराष्ट्रात येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु त्याच वेळी महाराष्ट्राबाहेर जाणाऱ्या मराठी माणसानेही तेथील स्थानिक भाषा आणि संस्कृतीचा आदर केला पाहिजे. हा परस्पर सन्मान भारताची खरी ताकद आहे. भारताची ओळखच विविधतेत एकता अशी आहे. देशाच्या एका भागातील माणूस दुसऱ्या भागात जाऊन रोजगार करतो, व्यवसाय करतो, कुटुंब स्थापन करतो. ही स्थलांतराची प्रक्रिया थांबवणे शक्यही नाही आणि योग्यही नाही.मुंबईसारख्या शहराचे वैशिष्ट्यच विविधतेत आहे. जगभरातील लोक या शहराकडे आकर्षित होतात. देशातील विविध राज्यांतील लोक येथे येतात. उद्योग, व्यापार, चित्रपटसृष्टी, सेवा क्षेत्र, बांधकाम, वाहतूक, हॉटेल व्यवसाय अशा अनेक क्षेत्रांत विविध भाषिक लोक काम करतात. त्यामुळे मुंबईला एका भाषेच्या चौकटीत बंदिस्त करणे म्हणजे तिच्या जागतिक स्वरूपालाच मर्यादा घालणे होय.महाराष्ट्राच्या विकासासाठी उद्योग आणि गुंतवणूक आवश्यक आहे. त्यासाठी सामाजिक स्थैर्य आवश्यक आहे. गुंतवणूकदाराला सुरक्षित वातावरण हवे असते. कामगाराला सुरक्षित वातावरण हवे असते. विद्यार्थ्याला सुरक्षित वातावरण हवे असते. व्यापाऱ्याला विश्वासाचे वातावरण हवे असते. नागरिकाला शांततेत जगायचे असते. मग अशा वातावरणाला बाधा आणणारे वाद का निर्माण करायचे? भाषा ही संवादाचे माध्यम असते; संघर्षाचे हत्यार नव्हे. इतिहासाकडून आपण शिकले पाहिजे. समाजात अंतर्गत कलह वाढला की बाहेरची शक्ती त्याचा फायदा घेते. आपल्या इतिहासात असे अनेक प्रसंग घडले आहेत. मोठमोठ्या सत्तांना अंतर्गत मतभेदांनी कमकुवत केले. पेशवाईची निर्मिती कशी झाली, सत्तेची केंद्रे कशी बदलली, अंतर्गत संघर्षांचा फायदा इंग्रजी सत्तेने कसा घेतला, याचा इतिहास आपण वाचला पाहिजे. परकीय सत्ता केवळ बाहेरून येऊन यशस्वी होत नाही; समाजातील अंतर्गत फूट तिला संधी देते. त्यामुळे इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये, याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे.याला विरोध, त्याला विरोध अशी राजकीय भूमिका घेऊन समाजाचे भले होत नाही. विरोध हा लोकशाहीचा आत्मा आहे; परंतु विरोधाला विवेकाची जोड असली पाहिजे. सरकारची एखादी योजना चांगली असेल तर तिचे कौतुक केले पाहिजे आणि चुकीची असेल तर तिच्यावर टीका केली पाहिजे. केवळ सरकार विरोधात आहे म्हणून प्रत्येक गोष्टीला विरोध करणे हा विवेक नव्हे. त्याचप्रमाणे सरकारच्या बाजूने आहोत म्हणून प्रत्येक गोष्टीचे समर्थन करणेही योग्य नाही.लोकशाहीमध्ये विवेक, संवाद आणि प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे.

आज देशासमोर भाषा, जात, धर्म, आर्थिक विषमता, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, शेतकरी आणि पर्यावरण असे असंख्य प्रश्न आहेत. या प्रश्नांवर राजकीय पक्षांनी आणि सामाजिक संघटनांनी गांभीर्याने चर्चा केली पाहिजे. समाजातील दुर्बल घटकांना सक्षम केले पाहिजे. तरुणांना रोजगार दिला पाहिजे. शिक्षणाची गुणवत्ता वाढवली पाहिजे. उद्योग वाढवले पाहिजेत. ग्रामीण भागाचा विकास केला पाहिजे. भाषेच्या प्रश्नाला अनावश्यक संघर्षाचे रूप देऊन या मूलभूत प्रश्नांपासून लक्ष विचलित होता कामा नये. महाराष्ट्राला भांडणाऱ्या समाजाची नव्हे, तर प्रगती करणाऱ्या समाजाची गरज आहे. मराठी माणसाला त्याच्या भाषेचा अभिमान असायलाच हवा. पण त्या अभिमानात व्यापक भारतीयत्व आणि माणुसकीचा समावेश असला पाहिजे. माझी भाषा मोठी म्हणताना तुझी भाषा कमी असे म्हणण्याची गरज नाही. प्रत्येक भाषा तिच्या लोकांसाठी प्रिय असते. प्रत्येक भाषेत इतिहास, साहित्य, संस्कृती आणि भावना दडलेल्या असतात. त्यामुळे भाषेचा सन्मान म्हणजे माणसाचा सन्मान. आपल्या मुलांना मराठी शिकवा. त्यांना मराठी साहित्य वाचायला द्या. संतांचे विचार सांगा. शिवाजी महाराजांचा इतिहास सांगा. फुले-शाहू-आंबेडकरांचा सामाजिक विचार समजावून सांगा. त्याच वेळी त्यांना इंग्रजी, हिंदी आणि इतर भारतीय भाषा शिकू द्या. जगाशी संवाद साधण्यासाठी अनेक भाषा येणे ही कमजोरी नाही; ती ताकद आहे.एकापेक्षा अधिक भाषा येणारा माणूस अधिक व्यापक जग समजू शकतो. त्याला विविध संस्कृती समजतात. त्याच्या विचारांची क्षितिजे विस्तारतात. त्यामुळे बहुभाषिक भारताला बहुभाषिक नागरिकांची गरज आहे. मराठी वाचली पाहिजे, बोलली पाहिजे, वाढली पाहिजे; पण मराठी वाढवण्याचा मार्ग प्रेमाचा असला पाहिजे. सक्तीच्या मार्गाने मराठीचा विस्तार झाला तरी मन जिंकता येणार नाही. उलट दबावामुळे प्रतिक्रिया निर्माण होईल. ज्याला मराठी शिकायची इच्छा आहे तो आनंदाने शिकेल; पण ज्याच्यावर दबाव आणला जाईल, तो कदाचित भाषेपासूनच दूर जाईल. म्हणून मराठीच्या प्रसारासाठी सकारात्मक वातावरण तयार करणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्राला वातावरण तापवणाऱ्या वक्तव्यांची नव्हे, तर वातावरण शांत करणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. समाजातील वेगवेगळ्या घटकांना एकत्र आणणाऱ्या विचारांची गरज आहे. मतभेद असतीलच; पण मनभेद वाढू नयेत, याची काळजी घ्यावी लागेल.राजकारण येते-जाते. सत्ताधारी बदलतात. पक्ष बदलतात. निवडणुका होतात आणि संपतात. पण समाज कायम राहतो. त्यामुळे निवडणुकीच्या राजकारणासाठी समाजात निर्माण केलेली दरी पुढच्या पिढ्यांना भोगावी लागू नये, याचे भान राजकीय नेतृत्वाने ठेवले पाहिजे.भाषा हा अस्मितेचा विषय आहे, त्यामुळे त्याला हात घालताना अधिक संवेदनशीलता आवश्यक आहे. मराठीचा सन्मान राखा; पण दुसऱ्या भाषेचा अपमान करू नका. मराठीचा आग्रह धरा; पण दबाव आणू नका. मराठी शिकण्यास प्रोत्साहन द्या; पण भीती निर्माण करू नका. माणूस जोडला तर भाषा आपोआप जोडली जाईल.

माणसे जोडणे ही समाजाची सर्वांत मोठी जबाबदारी आहे. आज आपण विवेक गमावला तर उद्या त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. समाजात एकदा संशयाची भिंत उभी राहिली की ती पाडणे सोपे नसते. आज एका भाषेचा प्रश्न आहे; उद्या जात, धर्म, प्रांत किंवा अन्य कोणता प्रश्न पुढे येईल. प्रत्येक प्रश्नावर समाजाला विभागत राहिलो तर शेवटी उरेल काय? आपली सामूहिक शक्तीच कमी होईल. म्हणूनच आज गरज आहे ती भाषेच्या सक्तीची नव्हे, तर भाषेच्या सन्मानाची. संघर्षाची नव्हे, संवादाची. दबावाची नव्हे, समजुतीची. द्वेषाची नव्हे, माणुसकीची.मराठी माझी आहे, म्हणून मला तिचा अभिमान आहे. पण तुझी भाषा तुझी आहे, म्हणून तिचाही मला सन्मान आहे. या भावनेतूनच महाराष्ट्राचा विकास होऊ शकतो. सुखाने जगा आणि लोकांनाही जगू द्या हीच खरी पारमार्थिक क्रिया आहे. वादग्रस्त विधाने करून, वातावरण तापवून किंवा माणसांना एकमेकांविरुद्ध उभे करून समाजाला काहीही प्राप्त होणार नाही. उलट माणसे तुटतील. आणि एकदा माणसे तुटली की समाजाची शक्ती तुटते.महाराष्ट्राने देशाला अनेक मोठे विचार दिले आहेत. सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला आहे. त्या महाराष्ट्राने भाषेच्या प्रश्नावरून स्वतःची सामाजिक वीण कमकुवत करणे योग्य ठरणार नाही. मराठीचा जयघोष जरूर करा; पण त्यासोबत माणुसकीचाही जयघोष करा.भाषा जपा, संस्कृती जपा, अस्मिता जपा; पण माणूसही जपा. कारण शेवटी कोणतीही भाषा माणसासाठी आहे आणि माणूस कोणत्याही एका भाषेसाठी जन्मलेला नाही. मराठीची सक्ती योग्य आहे का, या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपण एवढे मात्र लक्षात ठेवले पाहिजे,मराठीवर प्रेम असावे, मराठीचा अभिमान असावा; पण मराठीच्या नावावर माणसांमध्ये भिंती उभ्या करू नयेत.याच विवेकाची आज महाराष्ट्राला सर्वाधिक गरज आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कृषी कार्यालयात साहेब गायब;शेतकरी वाऱ्यावर!

## अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून शासनाच्या वेळेलाच केराची टोपली?



माहूर/प्रतिनिधी-शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे, शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देणे आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन करणे, यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय महत्त्वाचे मानले जाते. मात्र याच कार्यालयातील अधिकारी - कर्मचारी कार्यालयीन वेळेतच गायब राहत असल्याच्या तक्रारी आता ऐरणीवर आल्या आहेत.

दि. ३१ रोजी सकाळी १० ते ११ वाजेदरम्यान करण्यात आलेल्या पाहणीत एक कर्मचारी वगळता इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या दिसल्याने शेतकऱ्यांच्या तक्रारींना प्रत्यक्ष परिस्थितीचा दुजोरा मिळाल्याचे चित्र आहे. शासनाने शासकीय कार्यालयांसाठी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ निश्चित केली आहे. मात्र वेळेचे बंधन शासनाने घातले असताना माहूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून त्याचे पालन केले जाते की नाही, असा सवाल उपस्थित झाला आहे. कार्यालयीन वेळेत अधिकारीच उपस्थित नसतील, तर शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडायच्या कुणाकडे आणि शासनाच्या योजनांचा लाभ घ्यायचा तरी कसा, असा संतप्त प्रश्न शेतकरी विचारत आहेत. ग्रामीण भागातून शेतकरी मोठ्या अपेक्षेने कृषी कार्यालयात येतात. विविध अनुदान योजना, कृषी विभागाच्या योजना, कागदपत्रांची पूर्तता, पीकविषयक कामे आणि अन्य प्रशासकीय बाबींसाठी त्यांना कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. एका कामासाठी वारंवार तालुक्याच्या ठिकाणी येणे म्हणजे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जाणे. त्यात कार्यालयात आल्यानंतर अधिकारी-कर्मचारीच जागेवर नसतील, तर शेतकऱ्यांनी दाद मागायची तरी कोणाकडे? शेतकऱ्यांनी वेळ पाळायची आणि अधिकाऱ्यांनी नाही? असा संतप्त सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. दि.३१ रोजी स. १० ते ११ या कार्यालयीन वेळेत पाहणी केली असता केवळ एक कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले, तर अन्य अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या होत्या. त्यामुळे शासनाच्या कार्यालयीन वेळेचे पालन प्रत्यक्षात कितपत होते, याची वरिष्ठ पातळीवर तपासणी होणे आवश्यक आहे. कार्यालयीन वेळेचे पालन न करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कोणाचे नियंत्रण आहे? उपस्थितीची नियमित तपासणी होते का? वरिष्ठ अधिकारी कार्यालयीन कामकाजावर लक्ष ठेवतात का? शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवित असले, तरी त्या योजनांची अंमलबजावणी करणारे कार्यालयच वेळेवर उघडे आणि अधिकारी-कर्मचारी उपस्थित नसतील, तर योजनांचा लाभ कागदावरच राहण्याची भीती आहे.माहूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची अचानक तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, तसेच शासनाच्या कार्यालयीन वेळेचे पालन न करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. जिल्हा कृषी अधीक्षकांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली नाही, तर कार्यालय आहे; पण अधिकारी कुठे? हा प्रश्न आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## बेंगळुरु एक्सप्रेसमध्ये कायमस्वरुपी डब्यांची वाढ

नांदेड/प्रतिनिधी-प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन दक्षिण पश्चिम रेल्वेच्या गाड्यांमध्ये कायमस्वरुपी डब्यांची वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार एसएमव्ही बेंगळुरु- नांदेड-बेंगळुरु एक्स्प्रेसच्या (१६५९३/१६५९४) संरचनेत कायमस्वरुपी वाढ करण्यात आली आहे. या गाडीच्या विद्यमान १८ डब्यांच्या तुलनेत २ अतिरिक्त तृतीय श्रेणी वातानुकूलित डबे वाढविण्यात आले असून, गाडीची सुधारित डब्यांची संख्या २० झाली आहे. सदरील वाढ बेंगळुरु येथून १ सप्टेंबर पासून, तर नांदेड येथून ३ सप्टेंबरपासून लागू होईल.

## फवारणीतील विषबाधा टाळण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज

हदगांव/प्रतिनिधी-तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांवर विविध कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकरी व शेतमजुरांकडून मोठ्या प्रमाणात कीटकनाशकांची फवारणी केली जात आहे. मात्र फवारणी करताना आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर होत नसल्याने विषबाधेचा धोका वाढला असून, शेतकरी व शेतमजुरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कीटकनाशकांची फवारणी करताना हातमोजे, मास्क, डोळ्यांचे संरक्षण करणारे चष्मे, अंग झाकणारे कपडे आदी सुरक्षा साधनांचा वापर करणे आवश्यक आहे. मात्र ग्रामीण भागात अनेक शेतमजूर सुरक्षा साधनांशिवाय फवारणीचे काम करताना दिसून येतात. त्यामुळे त्वचेवर औषधाचा संपर्क येणे, श्वासावाटे रसायने शरीरात जाणे तसेच डोळ्यांना इजा होण्याचा धोका निर्माण होतो. फवारणी करताना कीटकनाशकांची योग्य मात्रा, मिश्रणाची पद्धत, फवारणीची सुरक्षित वेळ, वाऱ्याची दिशा आणि फवारणीनंतर घ्यावयाची काळजी याबाबत शेतकरी व मजुरांना योग्य माहिती मिळणे गरजेचे आहे. फवारणीदरम्यान धूम्रपान अथवा खाद्यपदार्थांचे सेवन टाळावे, तसेच औषधांच्या रिकाम्या बाटल्या व पॅकिंगची योग्य विल्हेवाट लावणेही आवश्यक आहे. हदगांव तालूक्यातीलकृषी विभागाने शेतकऱ्यांना तातडीने जनजागृती करून आवश्यक सुरक्षा किट उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. शासनाच्या विविध योजनांतून शेतमजुरांच्या सुरक्षेसाठी संरक्षण साहित्य उपलब्ध करून देण्याची तरतूद असतानाही त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याची बाबही पुढे येत आहे. हदगांवतालुक्यातील शहराच्या परिसरासह निवघा तामासा मनाठा सर्कल मधील शेतमजुरांना संरक्षण किट कधी उपलब्ध होणार..याबाबत कृषी विभागाने स्पष्ट मार्गदर्शन करावे,अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.परंतू कृषी विभागने या बाबतीत काय उपाययोजना केलेली आहे याबाबत माध्यमा ना कोणतीही माहिती दिलेली नाही.

## भटक्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिक हैराण; न.पा.कडे डॉग स्कॉड पाठवण्याची मागणी

किनवट/प्रतिनिधी-किनवट शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून आवारा (भटक्या) कुत्र्यांनी शंभरहून अधिक लोकांना चावा घेतलाय. मोकाट कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे किनवट शहराध्यक्ष शेख फारूक यांनी किनवट नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने 'डॉग कॅचिंग स्कॉड' (कुत्रे पकडणारे पथक) तैनात करण्याची मागणी केली आहे. शहरातील सरदारनगर, साईनगर, आंबेडकर चौक, खैरूद्दीनमार्ग, रेल्वे स्टेशन, बसस्टँड, सुभाषनगर, गंगानगर, रामनगर आणि इस्लामपुरासह विविध भागांत आवारा कुत्र्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. परंतु त्यांच्या बंदोबस्त केला जात नाही. पादचाऱ्यांवर चावा घेणाऱ्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे लहान मुलांना, महिला व वृद्धांना घराबाहेर जाणे असुरक्षित झाले आहे. परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट करताना निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या १५ दिवसांत किनवट (गोकुंद्दा) उपजिल्हा रुग्णालयात १०० हून अधिक रेबीजबाधित रुग्णांनी लसीकरण केल्याची नोंद




झाली आहे.यामुळे संपूर्ण शहरात भीतीचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून नगरपरिषदेने त्वरित कुत्रे पकडणारे पथक पाठवून निर्बिजीकरण मोहीम हाती घेतल्यास सोयीचे होणार असल्याचे शेख फारूक यांचे म्हणणे आहे.

## नंदनशिवणी येथील हनुमान मंदिरात चोरी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहर व जिल्ह्यात चोरी व घरफोडीचे सत्र सर्रासपणे सुरु आहे. नंदनशिवणी येथे हनुमान मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी फोडून ३ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला आहे.

रविवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी हनुमान मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. मुर्तीवरील सोन्याचे दागिणे काढून घेतले. तसेच दानपेटीचे कुलूप तोडून त्यामधील रोख रक्कम असा ३ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. ईश्वर गणपती देवकते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कंधार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनी कोकाटे हे करीत आहेत.



### जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,मुदखेड यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३१/२०२६
कमलबाई देशमुख व इ.विरुद्ध निरंक

१. कमलबाई भ्र.लक्ष्मनराव देशमुख, वय : ७९ वर्षे, धंदा : घरकाम रा.मयुर विहार कॉलनी यशवंतनगर, पावडेवाडी नाक्याजवळ नांदेड, २. वसंत पि.लक्ष्मनराव वाडीकर देशमुख, वय : ५१ वर्षे, धंदा : शेती रा.वाडी मुकत्ययारपुर पो.चिकाळा ता.मुदखेड जि.नांदेड, ३. संतोष पि.लक्ष्मणराव वाडीकर, (देशमुख) वय : ४७ वर्षे, धंदा : नौकरी रा.मयुर विहार कॉलनी यशवंतनगर, पावडेवाडी नाक्याजवळ नांदेड, ४. मंदा भ्र.रघुनाथराव पावडे, वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी रा. घर क्र.१२ सिध्दीविनायक संकुल छत्रपती चौक, नांदेड, ५. वंदना भ्र. अविनाश देशमुख, वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी रा.तळणी ता.हदगाव जि.नांदेड, ६. वैशाली भ्र.गजानन कल्याणकर, वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी रा.पिंपळगांव ता.अर्धापूर जि.नांदेड

...अर्जदार

विरुद्ध

...गैरअर्जदार

निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लक्ष्मण पि.दत्तराव देशमुख यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. लक्ष्मण पि. दत्तराव देशमुख यांचे दिनांक ०५/०२/२०२६ रोजी वाडी मुकत्यारपुर पो. चिकाळा ता.मुदखेड जि.नांदेड येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ मुले आणि अर्जदार क्र.४ ते ६ ह्या मयताच्या मुली आहेत. अशाप्रकारे अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत यांना ईतर वारस नाही.

मयत लक्ष्मण पि.दत्तराव देशमुख यांच्या मृत्युनंतर अर्जदारास विविध शासकिय व निमशासकिय कार्यालयामध्ये तसेच घरकुल योजनेकरीता वारस प्रमाणपत्राची गरज भासत असून तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जदारांना सन्माननीय न्यायालयातून मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणण्याची तोंडी सूचना केली आहे.

करिता याद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा काहि आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत दाखल करावा स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप दाखल करावा. दिलेल्या तारखेस हजर राहणेस व आक्षेप दाखल करण्यास कसुर केल्यास अर्जाची एकतर्फी चौकशी होउन पुढील आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **क.लिपिक** दि.न्या.क.स्तर,मुदखेड

स्वाक्षरित/- **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर,मुदखेड



## शशिकलाबाई बोन्तले यांचे निधन

उमरखेड/प्रतिनिधी-विडुळ येथील प्रतिष्ठित घराण्यातील लिंगेक्य. शशिकलाबाई मारोतीआप्पा बोन्तले. यांचे सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय ७७ वर्ष होते. त्यांच्या पश्चात संतोष आणि गणपत ही दोन मुले, सुना, नातवंडे आणि बराच मोठा आप्त परिवार आहे. त्याचा अंत्यविधी मंगळवार दि.१ सप्टेबर रोजी मोक्षधाम, विडुळ येथे करण्यात आला आहे.



### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५३/२०२६
MHND100008742026

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रेखा भ्र.रामेश्वर कागणे | वय-३७ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | ओम पि.रामेश्वर कागणे | वय-१८ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ३ | तुळसाबाई भ्र.देविदास कागणे रा.सर्वही कागणेवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-७० वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार -

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यांची आई असून, अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार क्र.२ ची आजी आहे. मयत नामे रामेश्वर देविदास कागणे हे होते. दिनांक २०/११/२०२३ रोजी मयत झाले आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की रामेश्वर देविदास कागणे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना रामेश्वर देविदास कागणे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत रामेश्वर देविदास कागणे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/०८/२०२६

आज रोजी दि.२३/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार



## शेतावरच ई-पीक पाहणी;ज्वारी खरेदीतील हेराफेरीला बसणार चपराक

किनवट/प्रतिनिधी-खरीप हंगामातील पिकांची अचूक डिजिटल नोंद करण्यासाठी किनवट तालुक्यात ई-पीक पाहणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. नियुक्त सहाय्यक प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची ऑनलाईन नोंदणी करीत आहेत. १५ ऑगस्ट पासून सुरू झालेली १० नोव्हेंबर पर्यंत राबवली जाणार आहे. पीक नोंदणीसाठी कोणी पैशाची मागणी केल्यास तहसीलदारांकडे तक्रार करावी.

यापूर्वी नेटवर्क अभावी तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना ही प्रक्रिया त्रासदायक ठरत होती. शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन शासनाने आता पीक पाहणीची जबाबदारी गाव पातळीवरील सहाय्यकांकडे सोपवलीय. या कामासाठी कोतवाल, ग्रामरोजगार सेवक, आशा सेविका, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील 'उमेद' कर्मचारी, सीएससी चालक आणि सहाय्यकांची नियुक्ती केली आहे. सहाय्यक थेट शेतात जाऊन प्रत्यक्ष पिकांची पाहणी करणार आहेत. डिजिटल प्रणालीवर नोंद करतील. ई-पीक पाहणीतील नोंदी या पीकविमा, नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी मिळणारी मदत, विविध कृषी योजना, पीकाधारित अनुदान, कृषी सांख्यिकी तसेच ॲग्रीस्टॅकसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील एकही शेतकरी पीक नोंदणीपासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासन सजग असल्याचे सद्याचे चित्र दिसते.सहाय्यकाने केलेल्या पीक पाहणी नोंदीची महसूल यंत्रणेकडून प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी ते सुद्धा शेतावर जाऊन पडताळणी करणार आहेत. नोंदीमध्ये काही त्रुटी आढळल्यास शेतकऱ्यांनी वेळेत संबंधित अधिकाऱ्यांकडे दुरुस्तीसाठी पाठपुरावा करावा. ई-पीक पाहणीदरम्यान काही अडचणी आल्यास त्यांनी तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर विश्वास फड (ग्राम महसूल अधिकारी, किनवट) यांच्याशी संपर्क साधावा लागणार आहे.

### शासकीय ज्वारी खरेदीत धूडघूस घालणाऱ्यांना बसणार लगाम

सहाय्यकांमार्फत प्रत्यक्ष ई-पीक पहाणी केल्यानंतर त्यातील तथ्येतेचे सुक्ष्म निरीक्षणासाठी महसूल विभाग फेर पडताळणी करणार असल्याने बनावट नोंदीला पूर्णविराम बसणार आहे. पर्यायाने शासकीय खरेदी केंद्रावर ज्वारी विक्रीत हेराफेरी करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या जाणार आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी वस्तूनिष्ठ ज्वारीचा पेरा केला असेल त्यांच्या ज्वारी विक्रीचा मार्ग सुकर होणार असे दिसते.

## आर्य समाजातर्फे श्रावणी वेदप्रचार महोत्सव

नांदेड/प्रतिनिधी-आर्य समाज नांदेडच्या वतीने श्रावणी वेदप्रचार मासानिमित्त तीन दिवसीय श्रावणी वेदप्रचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान जुना मोंढा परिसरातील आर्य समाज मंदिरात होणार आहे.

महोत्सवात यज्ञ, वैदिक प्रवचने, ज्ञानयज्ञ, महिला संमेलन तसेच शंका-समाधान अशा विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथील वैदिक विद्वान व व्याख्याते डॉ. श्री आशर्फीलालजी शास्त्री हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच एटा (उत्तर प्रदेश) येथील भजनोपदेशक पं. शिवपालजी आर्य हे भजन व उपदेशाच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० आणि सायं.६ ते ८ या वेळेत ज्ञानयज्ञ, व्याख्याने व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. या वैदिक ज्ञान व प्रबोधनाच्या पर्वात नागरिकांनी सहकुटुंब सहभागी होऊन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य समाज नांदेडच्या अध्यक्षा श्रीमती जी. व्ही. मारमपल्ले, मंत्री ड. ओम ऋतुध्वज कदम, कोषाध्यक्ष यादवजी भांगे, उपप्रधान अभय कुलकर्णी, उपमंत्री धोंडीबा सुरावार, व्यवस्थापक गजानन डोके यांच्यासह सर्व मार्गदर्शक व सदस्यांनी केले आहे.



### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०१/०९/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार मरीबा तुकाराम देवकांबळे रा.आंबुलगा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.तुकाराम रामा देवकांबळे रा.आंबुलगा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव तुकाराम रामा देवकांबळे रा.आंबुलगा ता.कंधार या ठिकाणी दिनांक २४/१०/१९९३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०१/०९/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०५/०५/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.रमेश उमाजी जाधव रा.रामानाईक तांडा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.रमेश उमाजी जाधव रा.रामानाईक तांडा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव रमेश उमाजी जाधव रा.रामानाईक तांडा ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०१/०६/१९७० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०५/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# तोटंबा घाटात जीपचा भीषण अपघात;तिघांचा जागीच मृत्यू,सात जण गंभीर



किनवट/प्रतिनिधी- सहस्त्रकुंड येथील महादेवाचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासात असलेल्या भाविकांच्या कमांडर जीपचा तोटंबा घाटात जोरदार अपघात झाला. त्यात तीन प्रवास्यांचा जागीच मृत्यू झाला तर जब्बरदस्त मार लागलेल्या सात भाविकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना उपचारासाठी तेलंगणा राज्यातील कुबेर येथील आरोग्य केंद्रात पाठवले. उपचारासाठी नेत असताना जीप चालकाचाही वाटेतच मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजताचे दरम्यान घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर नांदेड जिल्हा पोलीस प्रमुख, भोकरच्या अप्पर पोलीस अधीक्षक, किनवटचे उपविभागाय पोलीस अधिकारी आणि इस्लापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी रात्री भेट देऊन घटनास्थळाची पहाणी केल्याचे वृत्त आहे.

श्रावण महिन्यातील ३१ ऑगस्ट रोजीच्या तिसऱ्या सोमवारी किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड येथील महादेवाच्या दर्शनासाठी तेलंगणा राज्याच्या कुबेर मंडळातील पार्डी येथील भाविक आले होते. दर्शन घेऊन परतीच्या प्रवासात असताना सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तोटंबा गावानजीकच्या घाटात कमांडर जीपचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत आवला गंगाधर (वय ५५), तुम साइलू (वय ६०), तुम गौराबाई (वय ६०) या तिघांचा जागीच मृत्यू झाला तर उर्वरित सात जण गंभीर जखमी झाले त्यांना उपचारासाठी घेऊन जात असतांना वाटतेच ए.पी.२५-ए.एच.६७४७ या कमांडर जीप चालकाचाही मृत्यू झाल्याचे समजते. जवळपास बारा भाविक गाडीत होते. जखमींवर तेलंगणा राज्यातील कुबेर मंडळाच्या रुग्णालयाकडे उपचारासाठी पाठविण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तात्काळ उपचार मिळावा यासाठी भाविकांच्याच तालुक्यातील आरोग्य विभागाकडे पाठवून मदतकार्य केले. दरम्यान नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहण, भोकरच्या अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, किनवटचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम आणि इस्लापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. इस्लापूर पोलीसांनीही महत्वाची भूमिका बजावली असून पुढील तपासातून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकेल.

## उत्तराखंडात भूस्खलन; तिघांचा बळी

अल्मोरा:नेपाळ नंतर नैसर्गिक आपत्तीची झळ आता भारतालाही बसू लागली असून, उत्तराखंडच्या डोंगराळ भागात मुसळधार पावसामुळे भूस्खलनाच्या घटना वाढल्या आहेत. मंगळवारी सकाळी अल्मोरा जिल्ह्यातील हल्द्वानी भागातील उदयुडा गावात भूस्खलनाचा मोठा ढिगारा घरावर कोसळल्याने दोन महिला आणि एका चिमुकल्याचा मृत्यू झाला. काल रात्रीपासून अल्मोरा जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे डोंगराचा मोठा भाग खचून माती आणि दगडांचा ढिगारा अचानक निवासी घरात घुसला.

# अवैधरित्या गुटखा वाहतूक करणारी कार पोलीसांनी पकडली



नांदेड/प्रतिनिधी- अवैधरित्या गुटखा वाहतूक करणारी कार अर्धापूर पोलीसांनी सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी पार्डी मक्ता येथील उड्डाणपुलाजवळ पकडली आहे. कारमधील ३ लाख १७ हजार रुपयांचा गुटखा पोलीसांनी जप्त केला आहे.

एका कारमधून अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्याची माहिती अर्धापूर पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक महादेव मांजरमकर, सपोनी भास्कर कांबळे, फौजदार भोसले व पोलीस कर्मचाऱ्यांनी पार्डी मक्ता येथील उड्डाण पुलाजवळ सोमवारी सायंकाळी सापळा रचून संशयास्पदरित्या जाणारी कार एमएच १४ ईसी-४६७७ अडविली. पंचासमक्ष पोलीसांनी कारची तपासणी केली असता त्यामध्ये शासनाने बंदी घातलेला विविध कंपनीचा गुटखा पोलीसांना आढळून आला. पोलीसांनी कार व गुटखा असा ८ लाख १७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी कार चालक सय्यद मुख्तार स. रसुल रा.पूर्णा यास अटक केली असून त्याच्या विरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




नांदेड शहरातील कुसूम सभागृह ते रेल्वेस्थानक या मार्गावरील अतिक्रमण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथक व शहर वाहतूक शाखेच्या वतीने संयुक्त मोहीम राबवून पोलीस बंदोबस्तात आज (मंगळवार) हटविण्यात आले. या मोहिमेत पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच महापालिकेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

# बंटीभाऊ लांडगे यांचा युवा समाजरत्न पुरस्काराने गौरव

नांदेड/प्रतिनिधी-आंबेडकरी चळवळीचे युवा नेते आनंद उर्फ बंटीभाऊ लांडगे यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य युवा समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दै. सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल बबन कांबळे यांच्या हस्ते रविवारी नियोजन भवन येथे आयोजित कार्यक्रमात हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी भदंत पाय्यबोधी महाथेरो, दै. सम्राटचे जिल्हा प्रतिनिधी संभाजी कांबळे, भिक्खू महासंघाचे पदाधिकारी, डॉ.फुगारे, रमेश सोनाळे, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, सुभाष कटकांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. बंटीभाऊ लांडगे यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. गोरगरीब व गरजू रुग्णांना वेळेवर उपचारासाठी रुग्णालयात जाता यावे, यासाठी त्यांनी मोफत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिली आहे. अनाथ व निराधार व्यक्तींना मदत करण्यासाठीही ते सातत्याने पुढाकार घेत आहेत. नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून शहरातील विविध भागांत बोअरवेल करून दिल्या आहेत. लॉकडाऊनच्या काळात मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून नागरिकांना मदतीचा हात दिला. रमजान ईदच्या निमित्ताने सर्व धर्मगुरूंना एकत्रित करून सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारे विविध समाजोपयोगी कार्यक्रम त्यांच्या पुढाकारातून आयोजित केले जातात. सामाजिक बांधिलकी, गरजूंची मदत, सामाजिक सलोखा आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय योगदान दिल्याची दखल घेत बंटीभाऊ लांडगे यांना युवा समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. बंटीभाऊ लांडगे यांचे मित्र परिवार व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.



# उमरखेडमध्ये बुधवारी मातंग समाजाचा जनआक्रोश महामोर्चा

उमरखेड/प्रतिनिधी- अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ दि.२ सप्टेंबर रोजी उमरखेड येथे सकल मातंग समाजाच्या वतीने भव्य जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

अनुसूचित जातीमध्ये ५९ जातींचा समावेश असून त्यांच्या विकासासाठी १३ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. मात्र या आरक्षणाचा लाभ सर्व जातींना समान मिळाला नसल्याने काही जाती आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. मातंग समाज लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीत दुसऱ्या क्रमांकावर असूनही त्याला पाहिजे तसा लाभ मिळाला नाही. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास जातींना न्याय देण्यासाठी अ, ब, क, ड अशा पद्धतीने उपवर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे. हा महामोर्चा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातून सकाळी ११ वाजता निघेल व दुपारी १२ वाजता उपविभागीय कार्यालयाजवळ त्याचे रूपांतर जाहीर सभेत होणार आहे. या सभेला मार्गदर्शन करण्यासाठी माजी आमदार नामदेवराव ससाने, अजिंक्य चांदणे, कैलास खंदारे, सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक डॉ. अंकुश गोतावळे, सचिन बगाडे, संजय कंठाळे, विजय अंभोरे, मारोती वाढेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या जनआक्रोश महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी चव्हाण, ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३०२/२०२६
कविता व इतर विरुध्द निरंक

अर्जदार १. कविता भ्र.संतोष रोंदळे वय: ३० वर्षे, धंदा घरकाम, २. अर्जुन पि. संतोष रौंदळे वय : ११ वर्षे, धंदा : शिक्षण, ३. भाग्यश्री पि.संतोष रोंदळे वय - वर्षे, धंदा - अर्जदार क्र. २ व ३ अ पा क आई अर्जदार क्र. ४. सिताबाई भ्र. साहेबराव रोंदळे वय: ५५ वर्षे, धंदा घरकाम, ५. साहेबराव पि.जयवंतराव रोंदळे वय : ७२ वर्षे, धंदा मजुर, सर्व रा. ग्यानमाता शाळा रोड, विठ्ठल नगर, नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्यूलेशन ऑक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ५ यांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत संतोष पि. साहेबराव रोंदळे यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा, अर्जदार क्र.३ ही मुलगी, अर्जदार क्र.४ ही त्यांची आई व अर्जदार क्र.५ हे त्यांचे वडील आहेत. त्यांचा मृत्यू दिनांक २३/०३/२०२५ रोजी नांदेड येथे झाला. त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत संतोष पि. साहेबराव रोंदळे यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक ०६/१०/२०२६ पर्यत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा / सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २८/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
७ वे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड


# मतदार यादीतील नाव तपासून ३० सप्टेंबरपूर्वी त्रुटी दुरुस्त कराव्यात-श्रावण पाटील भिलवंडे



नांदेड/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी या यादीत आपले नाव, पत्ता तसेच अन्य तपशील योग्य आहेत की नाही, याची पडताळणी करून घ्यावी. मतदार यादीतील नोंदीमध्ये काही त्रुटी आढळल्यास ३० सप्टेंबरपूर्वी आवश्यक ती दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन भाजप नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

मतदार यादी संदर्भातील दावे व हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराने प्रारूप मतदार यादी तपासून आपले नाव आणि इतर तपशीलांची खात्री करणे आवश्यक आहे. नवीन मतदार म्हणून नाव नोंदविण्यासाठी नमुना क्र.६, मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७, तर नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्र.८ वापरता येणार आहे. तसेच १ ऑक्टोबर रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र युवक-युवतींनाही नमुना क्रमांक ६ द्वारे मतदार यादीत नाव नोंदविता येणार आहे. संबंधित अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित निवडणूक कार्यालयात अथवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे सादर करता येतील. मतदार यादीत नाव नसल्यामुळे मतदानाच्या वेळी अडचण निर्माण होऊ नये, यासाठी नागरिकांनी आताच यादी तपासून घ्यावी. नाव, पत्ता किंवा अन्य तपशील चुकीचा असल्यास विहित मुदतीत अर्ज करून त्याची दुरुस्ती करून घ्यावी. पात्र नागरिकांनीही मतदार म्हणून नोंदणीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.


## टि.सी.हरवली

माझी कदम शिवदास नारायण या नावाची बि ए प्रथम वर्षातील नापासची टि.सी.व इतर कागदपत्रे कुरुळा ते कंधार प्रवास करत असताना कंधार बस्थानक परिसरात हारवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता
**कदम शिवदास नारायण**
रा.कारतळा ता.कंधार,जि.नांदेड. मो क्रं.+९१९४०४७८६६३५


# विखे पाटील अंतरवालीकडे रवाना

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील मंत्रिमंडळाची बैठक आटोपून अंतरवालीकडे रवाना झाले. त्यामुळे शासन आणि मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांच्या भेटीकडे राजकीय तसेच सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

## नवरात्रीपूर्वी ठाकरेंचे...

होण्याची शक्यता असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीतील अनुपस्थिती आणि त्यानंतरचा संभाव्य दिल्ली दौरा यांचा परस्पर संबंध आहे का, याबाबतही राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

पान १ वरुन

## डिजीटल अरेस्टची...

उकळले. मात्र एवढी मोठी रक्कम दिल्यानंतरही आरोपींकडून संपर्क सुरूच राहिल्याने संबंधित व्यक्तीस संशय आला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेत संपूर्ण हकीकत सांगितली. त्यानंतर या प्रकरणाची माहिती सायबर सेल पोलिसांना देण्यात आली.या प्रकरणी सायबर सेल पोलिस ठाण्यात अमनकुमार शर्मा व संदीपराव या दोन संशयितांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑनलाइन व्यवहारांची माहिती, आरोपींनी वापरलेले मोबाईल क्रमांक, बँक खाती तसेच व्हॉट्सप कॉल आणि इतर डिजिटल पुराव्यांच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे. फसवणुकीची रक्कम कोणत्या खात्यांमध्ये वळविण्यात आली, या पैशांचा पुढे कुठे वापर झाला,याचाही तपास केला जात आहे.

## नशामुक्त महाराष्ट्राचा...

बंधनकारक राहणार आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पौष्टिक आणि संतुलित आहाराला प्रोत्साहन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सोलापूर शहरातील जुना पुणे नाका ते बोरामणी नाका या दरम्यानच्या उन्नत मार्ग प्रकल्पाला निकडीचा सार्वजनिक प्रकल्प म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर प्रस्तावित असून, त्यासाठी आवश्यक असलेली शासकीय जमीन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा मार्ग यामुळे मोकळा झाला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या पुढील कामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## खा.राहुल गांधी यांच्यावर...

पुतळ्यासमोर आंदोलन केले. या आंदोलनात काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, डॉ.रेखा चव्हाण, ॲड.सुरेंद्र घोडजकर, महेश देशमुख, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, नगरसेवक सत्यपाल सावंत, आनंदराव कल्याणकर, माजी नगरसेवक आलिमखान, दीपकसिंघ हजुरीया, रमेश चित्ते, श्याम पाटील, गणेश कोकाटे, नसीम पठाण, अब्दुल रशीद, शितल जोंधळे यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४